RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# संयत व तत्त्वशील राजकारणधुरंधर यशवंतरावजी चव्हाण

**डॉ. मनिषा उमाजी बटवाल (कोल्हे)**
पुणे

**प्रास्ताविक**

यशवंतराव चव्हाण हे आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार. ते एक कर्तव्यदक्ष प्रशासक, चतुर व मुत्सुद्दी राजकारणी, साहित्यप्रेमी रसिक, प्रखर स्वातंत्र्यसेनानी होते. महाराष्ट्राच्या आणि देशाच्या राजकारणात ज्यांनी स्वकर्तृत्वाने व नि:स्वार्थ भावनेने सबंध आयुष्यभर कार्य केले त्यामध्ये यशवंतराव चव्हाण नेहमीच अग्रस्थानी होते. मातृभूमीसाठी 'जिंकू किंवा मरु' या निर्धाराने स्वातंत्र्यलढयात सामील झालेल्या तरुणांचे यशवंतराव चव्हाण नेते होते. १२ मार्च १९१३ रोजी सातारा जिल्ह्यातील देवराष्ट्रे या खेड्यात जन्म झालेल्या यशवंतरावांचे वयाच्या पाचव्या वर्षीच पित्याचे छत्र हरवले. आईच्या संस्काराचे आणि स्वाभिमानाचे बाळकडू लहानपणापासूनच त्यांच्यात खोलवर रुजलेले दिसते. याचा प्रत्यय त्यांनी 'मी यशवंतराव चव्हाण होणार' अशा विद्यार्थीदशेतील जीवनात केलेल्या निर्धारावरुन दिसून येते.

यशवंतराव चव्हाण हे एक विलक्षण शूर, धाडसी, धीरोदात्त, निष्ठावान व्यक्ती होते. महात्मा गांधी त्यांचे स्फूर्तिदाते, गुरु होते, तर पंडित जवाहरलाल नेहरु त्यांचे तात्त्विक मार्गदर्शक होते. शालेय जीवनापासूनच शिवजयंती उत्सव, गणेशोत्सवाच्या कार्यक्रमांच्या माध्यमातून त्यांची सार्वजनिक क्षेत्रात काम करण्यास सुरुवात झाली होती. वाचनाच्या आवडीमुळे लहान वयातच त्यांना सामाजिक प्रश्न, बहुजनांचे प्रश्न, जाती—धर्माचे अंतर, सांस्कृतिक, आर्थिक, सामाजिक गळचेपींचे प्रश्न सतावीत असत. राष्ट्रीय स्वरुपाचे असे जे प्रश्न आहेत त्यासाठी आपण काहीतरी केले पाहिजे या विचारांनी ते प्रेरित झाले होते. याविषयी ते आपले आत्मचरित्र लिहिताना प्रास्ताविकात म्हणतात,

''स्वराज्याचा विचार टिळकांनी सांगितला आणि गरिबांची शिक्षणाने प्रगती झाली पाहिजे व समाजात समानता निर्माण झाली पाहिजे, हा विचार महात्मा ज्योतिराव फुल्यांनी सांगितला. हे दोन्ही विचार महत्त्वाचे म्हणुन दोन्ही माणसे आपल्या दृष्टीने मोठीच आहेत, या निर्णयाला मी माझ्या मनाशी आलो.''[१] या त्यांच्या विचारांचा परामर्श घेता त्यांच्या राजकीय विचारांची पायाभरणीच अशा उदात्त हेतूने आणि विचारांनी झालेली दिसते.

१९३१ साली पुण्याच्या नुतन मराठी विद्यालयात 'ग्रामसुधारणा' या विषयावर बोलून त्यांनी पारितोषिक मिळविले. वाचनातून जसे त्यांनी नवनवे विचार समजून घेतले तसेच ते ग्रामसंस्कृतीशी समरस होत असल्याने त्यांची जडण—घडण विविधांगी झाल्याचे दिसून येते. सायमन कमिशन हिंदुस्तानमध्ये आले, त्यावेळी क्रांतिकारक चळवळींनी उग्र रुप धारण केले होते. अनेक क्रांतिकारकांना तुरुंगात डांबण्यात आले, त्यांचा छळ करण्यात आला. त्यामध्ये यतींद्र दासांनी तुरुगांत आमरण उपोषण करुन ब्रिटिश सत्तेच्या निशेधार्थ आपला प्राणत्याग केला. या घटनेचा यशवंतराव चव्हाण यांच्या मनावर खोल परिणाम झाला. १९३० साली देशामध्ये राष्ट्रीय चळवळींनी आक्रमक स्वरुप धारण केले होते. त्यावेळी लाहोरच्या रावी नदीच्या तीरावर २६ जानेवारी १९३० रोजी यशवंतराव चव्हाणांनी एक प्रतिज्ञापत्र तयार करुन मित्रांसमवेत ते सर्वांना वाटले. राष्ट्रीय कॉंग्रेसच्या तिरंग्या झेंडयाखाली प्रतिज्ञावाचन करुन त्यांनी राजकीय जीवन खऱ्या अर्थाने सुरु केले.

साबरमती आश्रमातून गांधीजींनी १२ मार्चला दांडी—मोर्चा सुरु केला. त्यांचे पडसाद म्हणून कराडला जाहीर सभा होऊ लागल्या. सरकारने जेव्हा गांधीजींना पकडले तेव्हा ब्रिटिश सरकारच्या निशेधाच्या सभा आणि त्यांतून होणारी भाषणे यांतून जनजागृती सुरु झाली होती.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

त्यावेळी कृष्णा नदीच्या काठावर लहानशा सभांतून यशवंतराव चव्हाण बोलत असत. याप्रकारच्या भाषणांतून व्याख्यानांतून देशभक्ती, स्वातंत्र्य या विचारांनी त्यांच्यावर मोठा प्रभाव पाडला होता. सत्याग्रहाची चळवळ खेडयापाड्यात पोहोचविण्यासाठी, राष्ट्रप्रेमाचा संदेश देण्यासाठी ते भाषणे देत असत. तेव्हा यशवंतराव चव्हाण म्हणत, ''आपण सर्व कॉंग्रेसच्या झेंड्याखाली एकत्र येऊया, म्हणजे आपण स्वतंत्र होऊ''[२] त्यांच्या या भाषणांमधून दिलेल्या संदेशावरुन त्यांची राष्ट्रभक्ती दिसून येते. याच चळवळीचा भाग म्हणून ते कराड शहरामध्ये नित्याने सकाळी प्रभातफेरी काढीत असत. परिणामस्वरुप त्यांच्या मित्रमंडळींबरोबरच त्यांना खटल्याचे समन्स लागले. याचवेळी पुण्याच्या दैनिक 'ज्ञानप्रकाश' मध्ये प्रभातफेरीच्या खटल्याचे सविस्तर वृत्त ते त्या संपादकांना पत्रव्यवहार करुन देत असत. याच चळवळीचा एक भाग म्हणून पुढे ते रत्नागिरीला सावरकरांना प्रत्यक्ष भेटून त्यांच्याबरोबर चर्चा केल्याने स्फूर्ती मिळाली.

१९३१ च्या डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात गांधीजी गोलमेज परिषदेवरुन मुंबईस परतले तेव्हा पंडित नेहरुंना अटक झाली आणि ४ जानेवारीला गांधीजींना अटक करुन येरवडा तुरुंगात ठेवले. या वातावरणात यशवंतराव चव्हाण आणि त्यांचे २०—२५ मित्र ग्रामीण भागात जंगल सत्याग्रह करायचा आणि जास्तीत जास्त सत्याग्रही कारागृहात पाठवयच्या कामगिरीवर लागले. कराडला २६ जानेवारीला झेंडावंदनाची तयारी करण्याचे काम यशवंतराव चव्हाणांनी मित्रांकडे सोपविली. शहरातील सर्व प्रमुख भागात रात्रीच झेंडे लावायचे आणि गांधीजींच्या अटकेबद्दल सरकारच्या निषेधाच्या घोषणा रात्री गावातील प्रमुख ठिकाणी चिटकवायच्या आणि दुसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजता झेंडावंदन करायचे असे ठरवले. या कामात तात्या डोईफोडे नावाचा कार्यकर्ता पकडला गेला आणि चौकशीअंती नंतर यशवंतराव चव्हाण यांना अटक झाली. त्यांना अठरा महिने सक्तमजुरीची शिक्षा झाली. त्यावेळच्या कॉंग्रेस पक्षातर्फे हजर असलेल्या वकिलांनी त्यांना सांगितले, ''तुंम्हाला जास्त शिक्षा केली आहे, त्याचं कारण इतरांना दहशत बसावी'' हे कदाचित शक्यही असेल, पण आता अठरा महिने राहणे भागच आहे, तेव्हा हे आनंदाने स्वीकारले पाहिजे. असे मी माझ्या मनाला सांगू लागलो''[३] त्यांच्या या विचारांवरुन त्यांचा संयमी स्वभाव अधोरेखित होतो.

१९३७ ची निवडणूक सर्व राज्यांत, तसेच कराड, सातारसाठी पण ती विशेष महत्त्वाची होती. या निवडणुकीनंतर कॉंग्रेसचे सरकार बनणार होते. सत्तेच्या आधारावर सरकार बनवून जनतेची शक्ती संघटीत करुन त्याचा फायदा स्वातंत्र्य चळवळीसाठीसुद्धा होणार होता. या निवडणुकीच्या निमित्ताने यशवंतराव चव्हाण 'सरदार पटेल', 'पंडित जवाहरलाल नेहरु,' मानवेंद्रनाथ रॉय' अशा मोठमोठया व्यक्तींना भेटले होते. त्यांच्याशी विचारांची आदान—प्रदान करत होते. त्यामुळे आपली समस्या घेऊन लोक यशवतराव चव्हाण यांच्याकडे येत असत. त्यामुळे ते सातारा जिल्ह्यातील एक महत्त्वाचे घटक बनले होते.

८ ऑगस्ट १९४२ ला महात्मा गांधीजींनी भाषणात हिंदुस्थानच्या जनतेला तीन शब्दांचा मंत्र दिला, तो मंत्र म्हणजे ''करु किंवा मरु.'' मुंबईत उच्चारलेल्या या मंत्राचा परिणाम सबंध हिंदुस्थानात झाला. या ऐतिहासिक भाषणात गांधीजींनी ब्रिटिशांना ठणकावून सांगितले, ''चले जाव'' या दोन शब्दांनी १९४२ चा लढा सुरु झाला. ९ ऑगस्टला सूर्य उगवण्याआधीच ब्रिटिशांनी महात्मा गांधी व इतर नेत्यांना अटक केली. यशवंतरावांवर मोठी जबाबदारी आली होती. भूमिगत राहून जास्तीत जास्त लढा देण्याचे त्यांनी ठरविले होते. या लढ्यातील यशवंतरावांचे देशभक्तीवरील विचार व्यक्त करताना ॲड.मयुर जाधव त्यांच्या कराडच्या गुप्त बैठकीतील कार्यकर्त्यांसमोर बोलताना ते म्हणतात, ''गांधीजींनी अंतिम युद्धासाठी आपल्याला हाक दिली आहे. त्या हाकेला ओ देण्यासाठी आपण या स्वातंत्र्यसंग्रामात उडी घेत आहोत. यावेळचा लढा हा पूर्णत: वेगळा आहे. भूमिगत राहून आपणा सर्वांना ही लढाई लढायची आहे. शिवरायांच्या गनिमी काव्याचा हा आधुनिक

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
अवतार आहे. आपण सर्व मावळे तर गांधीजी आपले छत्रपती आहेत. सह्याद्रीच्या कुशीत लपूनच ही लढाई लढायची आहे. नियतीने दिलेली ही एक ऐतिहासिक संधी आपण घेतली पाहिजे. नियोजन हा या लढ्याचा आधार आहे, गुप्तता हा प्राण आहे, तर निष्ठा आणि विश्वास हा आत्मा आहे.''[४] त्यांच्या भाषणातूनच यशवंतरावांची संयमी आणि निष्ठावान वृत्ती समोर येते. जानेवारी १९४३ साली संक्रांतीच्या दिवशी वेणुताईंना पोलिसांनी अटक केली. तसेच या दरम्यानेच यशवंतरावांचे थोरले बंधु ज्ञानदेव यांचे निधन झाले. त्यांचे दुसरे बंधु गणतराव विजापुरच्या जेलमध्ये होते. तशाही परिस्थितीत यशवंतरावांना त्यांची देशभक्ती स्वस्थ बसू देत नव्हती. दहा महिने ब्रिटिश पोलिसांना झुलवत ठेवणाऱ्या यशवंतरावांना एका भारतीयानेच पोलिसांच्या हाती दिले होते. भाऊ मृत्यू पावल्यानंतरही जो घरी गेला नव्हता त्या योद्ध्याला देशवासियानेच पोलिसांच्या हातात दिले होते.

१९४५ साली हिंदुस्थानात आणि पर्यायाने सातारा जिल्यात निवडणूका झाल्या त्या निवडणुकीत यशवंतरावांसहित सर्व उमेदवार विजयी झाले होते. या विजयाविषयी बोलताना ॲड. मयुर जाधव लिहितात, ''देवराष्ट्रच्या मातीत जन्माला आलेले, मध्यम उंचीचे, काळया—सावळया रंगाचे, किडकिडीत शरीराचे, पितृछत्र हरवलेले, हातावर पोट घेऊन आईने कराडला आणलेले, परिस्थितीचे चटके खात ज्ञानासाठी दाही दिशा हिंडलेले, देशाची हाक आल्यावर कशाचीही पर्वा न करता बेफामपणे स्वत:ला झोकून देणारे पोरगे आज आमदार झाले होते.''[५] यशवंतराव प्रतिकूल परिस्थितीतील त्यांचे यश त्यांचा संयम आणि प्रखर देशभक्ती प्रकट करते.

१९४६ पासून यशवंतराव चव्हाणांच्या राजकीय कारकिर्दीला सुरुवात झाली. १९४८ साली हिंदु—मुसलमान दंगलीदरम्यान समाज संरक्षणासाठी त्यांनी 'होमगार्ड' ही संघटना मुंबई राज्यासाठी उभी केली. त्याचप्रमाणे ग्रामीण संस्कृती टिकवण्यासाठी तमाशा बोर्ड स्थापन करुन तमाशाला लोककलेची मान्यता मिळवून दिली. १९५२ सालच्या निवडणुकीत ते परत निवडून आले आणि मुंबई राज्याचे नागरी पुरवठा, समाजकल्याण आणि जंगल खात्याचे मंत्री झाले. २८ मार्च १९५५ रोजी विधानसभेत त्यांनी ग्रामपंचायतीची संख्या व अधिकार वाढविणारे विधेयक मांडले. ग्रामपंचायत प्रत्येक गावात स्थापन झाली पाहिजे असे त्यांचे ध्येय होते. वन्य पशु—पक्ष्यांचे संरक्षण करणारा कायदा आणणारे मुंबई हे देशातील पहिलेच राज्य यशवंतरावांच्या कारकिर्दीतच ठरले.

१ नोव्हेंबर १९५६ रोजी यशवंतराव मुख्यमंत्रीपदी आरुढ झाले. आणि १९५७ रोजी मार्चमध्ये विधानसभा निवडणुकीचे पडघम वाजू लागले होते. संयुक्त महाराष्ट्र समितीने निवडणुकीची कसून तयारी केली होती. ही निवडणूक म्हणजे यशवंतरावांची अग्निपरीक्षाच होती. या निवडणुकीत कराडमधून यशवंतरावांना पराभूत करायचे असा समितीचा निर्धार होता. या घटनेवर आणि यशवंतरावांच्या संयमी स्वभावावर ॲड.मयुर जाधव लिहितात, ''यशवंतरावांवर टीकेची राळ उठत होती. परंतु यशवंतरावांनी विवेकाची कास सोडली नाही. अत्यंत संयमी असे त्यांनी वर्तन ठेवले. समितीचा आपल्यावरील राग हा संयुक्त महाराष्ट्राकरिता आहे, हे त्यांना समजत होते. त्यांना स्वत:लाही मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र हवा होता. त्यामुळे समितीच्या आरोपांची त्यांनी फिकीर केली नाही. त्यांचा संयमी प्रचार सुरु होता.''[६] या निवडणूकीत यशवंतराव निवडून आले. ज्यावेळी पुण्याच्या बालगंधर्व नाटयगृहाचे उद्‌घाटन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाणांच्या हस्ते होणार होते, त्यावेळी नाटयगृहाबाहेर संयुक्त महाराष्ट्र समितीचे हजारो निदर्शक त्यांच्याविरुद्ध घोषणा देत होते. ज्यावेळी ते भाषणासाठी व्यासपीठावर उभे राहिले त्यावेळी पोलीस बंदोबस्त चुकवून काही निदर्शक महिला हातात बांगड्या घेऊन नाटयगृहात शिरल्या आणि यशवंतरावांसमोर जोरजोराने घोषणा देऊ लागल्या. नंतर पोलिसांनी त्यांना पकडले त्यावेळी सर्वांचे लक्ष यशवंतराव काय बोलतील याकडेच लागले होते. त्यावेळी ते म्हणाले, ''इतक्या नाट्यपूर्ण पार्श्वभूमीवर जगातील कोठल्याही नाटयगृहाचे उद्‌घाटन झाले नसेल. येथे आत्ताच घडलेल्या

नाटकाने या नाट्यगृहाचे उद्घाटन झाले असे मी जाहीर करतो.''७ यशवंतरावांच्या या संयमी, समयसूचक वागण्याने त्यांच्यातील सच्चा आणि देशभक्त राजकारणी जनतेसमोर दिसला होता.

मुख्यमंत्रीपदी असताना त्यांनी ज्या कुटुंबाचे उत्पन्न वर्षाला नऊशे रुपये आहे, त्या कुटुंबातील विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देण्याचा निर्णय घेतला. तसेच सबंध राज्यात इंग्रजी विषय शिकविण्याबाबत सरकारचा निर्णय घोषित केला. 'कसेल त्याची जमीन' हा कुळकायदा १ एप्रिल १९५७ रोजी तयार करण्यात आला. जमीन, पाणी, रस्ते इ. पायाभूत सुविधा जनतेला देण्याचा त्यांनी ध्यास घेतला होता. त्याचप्रमाणे साहित्यक्षेत्र भरभराटीला येण्यासाठी विद्वान, संशोधक, लेखक, कलावंत, दिग्दर्शक, संगीतकार, नाटक—ग्रंथ यांना बक्षिस देण्याचा प्रघात त्यांनी प्रथमच सुरु केला.

१ मे १९६० हा दिवस संयुक्त महाराष्ट्र निर्मितीचा मुहूर्त ठरलेला होता, ३० एप्रिलच्या रात्री बारा वाजून एक मिनिटांनीच संयुक्त महाराष्ट्राची घोषणा पंतप्रधान पंडित नेहरु करणार होते. सरकारी समारंभ राजभवनावर तर जनतेकरिता शिवाजी पार्कवर समारंभ आयोजित केला होता. यावेळी राजभवनाच्या दिमाखदार सोहळयात यशवंतराव बोलणार होते, त्या भाषणाची इंग्रजीतील एक लिखित प्रत अगोदरच पंडितजींकडे दिलेली होती. त्यातील यशवंतरावांच्या ''आणि जर कधी भारताच्या हिमालयावर संकट आलेच तर आपल्या काळया फत्तराची छाती हिमालयाच्या रक्षणाकरिता महाराष्ट्राचा सह्याद्री उभी करील. ''८ या वाक्याने पंडितजी प्रभावीत झाले होते. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीतील यशवंतरावांची कारकीर्द इतिहासातील सोनेरी पाने ठरली आहेत.

संयुक्त महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री असताना त्यांनी सातारा येथे 'नॅशनल डिफेन्स अकादमी' ही सैनिकी शाळा सुरु केली, आदिवासी मुलांसाठी आश्रमशाळा सुरु केली, औरंगाबाद आणि कराड येथे शासकीय महाविद्यालये सुरु केली. औद्योगिक क्रांती घडवून आणण्यासाठी त्यांनी 'महाराष्ट्र इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट कौन्सिल' स्थापन केले. सहकारी चळवळींचा विकास घडवून आणण्यासाठी विधेयक तयार करुन त्याचे कायद्यात रुपांतर केले. त्यामुळे सहकारी संस्थांचे जाळे महाराष्ट्रभर तयार झाले. दूध संघ, साखर कारखाने, सहकारी औद्योगिक वसाहती सहकारी सोसायट्या, सहकारी बॅंक सर्वत्र पसरल्या, सहकारी चळवळीच्या माध्यमातून कृषी औद्योगिक समाजरचना महाराष्ट्रात उभी राहिली. 'डायरेक्टोरेट ऑफ लॅग्वेजेस' हे नवीन खाते सुरु करुन मराठी साहित्य, इतिहास, संस्कृती, भाषा इ. क्षेत्रातील संशोधनाला चालना दिली. १२ जुलै १९६१ ला पाणशेत धरण फुटलेले असताना यशवंतराव स्वत: चार दिवस तेथे तळ ठोकून होते. त्या निमित्ताने आलेल्या सर्व संकटांना धीराने सामोरे जात त्यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीला लागलेले ग्रहण सोडवले होते. काहीही दोष नसताना त्यांनी तो संघर्ष मोठया संयमाने पेलला.

१९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले. भारताचा पराभव झाला. परिणाम स्वरुप कृष्णा मेनन यांना राजीनामा द्यावा लागला आणि देशाचे नवे संरक्षणमंत्री म्हणून पंडित नेहरुंनी ही सूत्रे यशवंतराव चव्हाण यांच्याकडे सोपविली. दिल्लीला जाण्यासाठी महाराष्ट्राचा निरोप घेताना शनिवार वाडयासमोर आपल्या भाषणात ते म्हणतात, ''सह्याद्री हा काही निर्जिव पर्वत नाही. महाराष्ट्राच्या उदात्त भावनांचे आणि उज्जवल परंपरेचे ते प्रतीक आहे. सह्याद्री आम्हांला प्रेरणा व स्फूर्ती देईल. एकवेळ भारत निर्मनुष्य होईल, शत्रूशी लढता—लढता ठार होण्याचेही पत्करील, पण तो गुलामगिरी कधीही पत्करणार नाही. या कामी सह्याद्री आपल्या छातीचा कोट करील.''९ हिमालयाच्या रक्षणासाठी यशवंतरुपी हा सह्याद्रीच उचित असल्याचे त्यांच्या या भाषणातून सूचित होते.

यशवंतराव चव्हाण संरक्षणमंत्री असताना त्यांनी अमेरिके बरोबर चर्चा करुन अत्याधुनिक युद्धसाहित्य भारताला उपलब्ध होण्यासाठी अमेरिका दौरा केला, परंतु ते असफल झाले नंतर त्यांनी रशिया दौरा करुन 'मिग—२१' जातीची विमाने भारतात

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

आणण्याचे आणि त्यांचे उत्पादन करण्यासाठी लागणारी मशिनरी भारताला उपलब्ध करुन देण्याचे आणि भारत देश युद्ध साहित्याच्या बाबतीत स्वावलंबी बनविण्याचे त्यांचे स्वप्न पुर्ण झाले.

१ सप्टेंबर १९६५ रोजी पाकिस्तानने सुरु केलेले युद्ध २२ सप्टेंबर १९६५ रोजी अवघ्या बावीस दिवसात भारताने संपविले. यशवंतराव चव्हाणांच्या नेतृत्त्वाने आणि यशवंत नीतीने काश्मिर वाचले होते. युनोच्या पुढाकाराने आणि इंग्लंड, अमेरिका, रशिया यांच्या दबावामुळे अखेर हे युद्ध थांबले. या युद्धात प्रतिशिवाजी आपल्या कार्याने तळपून निघाला होता. विजयी झाला होता. परंतु या घटने दरम्यानच त्यांच्या मातोश्रींचे निधन झाले होते. परिस्थिती आणिबाणीची असल्याने आईचे क्रियाकर्म आटोपून हा वीर राजनितीतज्ञ पुन्हा युद्धभूमीवर पोहोचला होता.

यशवंतराव संरक्षणमंत्री असताना पंडित नेहरु नंतर लाल बहादूर शास्त्री यांचेही निधन झाले. त्यावेळी पंतप्रधान पदाची संधी समोर दिसत असतानाही इंदिरा गांधींची संयुक्त महाराष्ट्राच्या वेळी केलेली मदत लक्षात ठेवून त्यांनी इंदिरा गांधींना पाठिंबा दिला. स्वतंत्र भारताच्या पंतप्रधान पदाला ते स्वतःहून नाही म्हणाले. त्यांनी तो मोह स्वतःच बाजूला सारला.

१४ नोव्हेंबर १९६६ रोजी इंदिरा गांधींनी यशवंतराव चव्हाण यांना गृहमंत्रीपदाचा कार्यभार दिला. नंतर त्यांच्या कार्यकुशलतेमुळे पुढे २६ जून १९७० ला ते भारताचे अर्थमंत्री झाले. देशाची राष्ट्रीय संपत्ती वाढली तरच त्या संपत्तीचे समाजाच्या सर्व घटकांत विभाजन करता येईल आणि लोकांचा आर्थिक स्तर वाढेल हे त्यांचे सूत्र होते. आपल्या अर्थमंत्री पदाच्या कारकिर्दीत त्यांनी देशाचा आर्थिक चेहरामोहरा बदलला आणि ११ ऑक्टोबर १९७४ ला त्यांनी परराष्ट्रमंत्री पदाची सूत्रे स्वीकारली. या काळात त्यांनी विविध देशांशी रेशीमगाठी बांधून त्या—त्या देशाच्या राज्यकर्त्यांचे मत अनुकूल करुन घेण्याचा प्रयत्न केला. शेजारच्या देशाशी सतत भांडणे करुन आपण शांततेने राहू शकत नाही म्हणूनच त्यांनी भारत—चीन संबंध सुरळीत करण्यास प्राधान्य दिले. त्यावेळचे अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री हेन्री किंसीजर यांच्याशी चर्चा करुन यशवंतरावांनी उद्योग, व्यापार, सांस्कृतिक कार्य व तांत्रिक क्षेत्रातील दोन्ही देशांतील सहकार्य वाढविण्यासाठी समझोता घडवून आणला. यामुळे भारत व अमेरिका यांच्यातील तणाव निवळला होता.

१९७९ सालच्या शेवटी जनता पक्षाचे सरकार कोसळले. या काळात यशवंतरावांनी विरोधी पक्षनेते पदाची धुरा सांभाळली होती. हे सरकार कोसळल्यानंतर चरणसिंगांनी कॉंग्रेसच्या पाठिंब्याने नवीन सरकार तयार केले. या सरकारमध्ये यशवंतराव चव्हाण देशाचे ‘उपपंतप्रधान’ झाले होते, परंतु इंदिरा गांधींनी पाठिंबा काढून घेतल्याने चरणसिंग सरकार कोसळले आणि १९८० साली लोकसभा बरखास्त होऊन सार्वत्रिक निवडणूक जाहीर झाली. यावेळी अर्स कॉंग्रेसतर्फे यशवंतराव सातारा मतदारसंघातून निवडून आले. इंदिरा गांधींचे सरकार स्थापन होऊन इंदिरा गांधी पंतप्रधानपदी विराजमान झाल्या मात्र यशवंतरावांची विलंबाने आठव्या अर्थआयोगाच्या अध्यक्षपदी नेमणूक करण्यात आली. परहित हाच ज्यांचा ध्यास होता, त्या यशवंतरावांना सत्तेत राहून सत्तेपासून जाणिवपूर्वक दूर ठेवण्यात आले. परंतु संयमी, सुशील, सुसंस्कृत, धीरोदात्त यशवंतरावांनी हे सर्व सहन केले.

१ जून १९८३ या दिवशी यशवंतरावांच्या पत्नी वेणुबाई यांचे निधन झाले. आई, दोन भाऊ, नंतर पत्नी यांच्या जाण्याने यशवंतराव एकाकी पडले होते. ३१ ऑक्टोबर १९८४ च्या इंदिरा गांधी यांच्या हत्येने ते व्यथित झाले. इंदिरा गांधीच्या हत्येने मुदतपूर्व निवडणुका घोषित झाल्या परंतु नियतीची योजना काही वेगळीच होती. सत्ता, आई, भाऊ, मित्र, सहधर्मचारिणी सर्वजण सोडून गेलेले होते. त्यामुळे एकाकी, अस्वस्थ यशवंतराव दिवसेंदिवस खचत होते. अशातच २५ नोव्हेंबर १९८४ या दिवशी यशवंतरावांची प्राणज्योत मालवली.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

**समारोप**

कर्तव्यनिष्ठा, सहकार्य, शिस्त यांबरोबरच लोकशाहीचा खरा अर्थ, नियोजनाचे महत्त्व व समाजवादाची कास घट्ट धरुन ठेवलेल्या यशवंतराव चव्हाणांचा आदर्श कायम मराठी मनावर कोरलेला राहील. रसिक, साहित्यिक, प्रखर स्वातंत्र्यसेनानी, मुत्सुद्दी राजकारणी याबरोबरच ते कनवाळू व्यक्तिमत्त्वसुद्धा होते. १९५६ ते १९६२ हा त्यांच्या जीवनातील सुवर्णकाळ होता. याच कालावधीत ते राजकारणधुरंधर व्यक्ती म्हणून नावारुपाला आले. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, नवमहाराष्ट्राची निर्मिती, चीनचे भारतावर आक्रमण, भारताचे मुख्यमंत्री, संरक्षणमंत्री, अर्थमंत्री, परराष्ट्र मंत्री, गृहमंत्री, लोकसभा विरोधी पक्षनेता, चरणसिंग मंत्रीमंडळात उपपंतप्रधान असा राजकीय ठसा उमटवत ज्यांनी आपले संपूर्ण जीवन देशाला समर्पित केले त्या व्यक्तिमत्त्वाच्या काही पैलूंचाच अभ्यास केला तरी त्यांच्यामधील संयत व तत्त्वशील राजकारणी अंत:करणाला स्पर्श करुन जातो.

**संदर्भ**

1. चव्हाणयशवंतराव, आत्मचरित्र, (कृष्णाकाठ), रोहन प्रकाशन, २२ एप्रिल २०१२, पृ. ३६.
2. तत्रैव, पृ. ६९.
3. तत्रैव, पृ. ११५.
4. जाधव (ॲड.) मयुर, ‘जाणता राजा यशवंतराव चव्हाण’, स्नेहवर्धन प्रकाशन, २५ नोव्हेंबर २०१३, पृ. ६५.
5. तत्रैव, पृ. ७९.
6. तत्रैव, पृ. १११.
7. तत्रैव, पृ. १२१.
8. तत्रैव, पृ. १३७.
9. तत्रैव, पृ. १५३.